पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट क्र. ७४ दिनांक २७/१२/२०२२

## "जनसंवाद अभियान" अंतर्गत कासा पोलीस ठाणे येथे सांस्कृतीक कार्यक्रमाचे माध्यमातून जनजागृती

पोलीस दलाचा सर्वसामान्य जनतेशी चांगला सुसंवाद व समन्वय राहावा तसेच पोलीस ठाणे हद्दीतील प्रत्येक गावामध्ये शांतता व सुरक्षितता आबाधित राहावी, या निमित्ताने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे अनमोल संकल्पनेतुन "जनसंवाद अभियान" ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने दि.२६/१२/२०२२ रोजी कासा पोलीस ठाणे अंतर्गत पुज्य आचार्य भिसे माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविदयालय, कासा, ता. डहाणु, जि. पालघर येथे जनजागृतीपर भव्य सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे माध्यमातून बालविवाह, महिला अत्याचार, अंधश्रध्दा निर्मुलन, व्यसनाधिनता, पर्यावरण संरक्षण, वाहतूकीचे नियम, सायबर क्राइम, वेठबिगारी, शेतकरी आत्महत्या, इत्यादी विषयांवर यु टयुब कलाकार व विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी पथनाट्य व गीतांच्या माध्यमातुन जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमास कासा पोलीस ठाणे हद्दीतील विविध गावामधून एकुण १२,००० नागरीक उपस्थीत होते. श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी कार्यक्रमातील उपस्थित सर्व नागरीकांना जनसंवाद अभियान संकल्पना काय आहे ? ते कशाप्रकारे राबविण्यात येत आहे ? त्याचे महत्त्व काय आहे ? याविषयी मार्गदर्शन केले. तसेच पोलीस विभाग हे आपल्या सोबत असून सर्व जनतेने पोलीसांसोबत राहून सहकार्य करावे असे आवाहन केले.

सदर कार्यक्रम हा श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली यशस्वी झाला असून कार्यक्रमास श्री. पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्री. शैलेश काळे, पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर, श्री. संजीव पिंपळे, उपविभागीय पोलीस अधिकारी डहाणु अतिरीक्त चार्ज जव्हार विभाग, श्री. अभिजीत देशमुख, तहसीलदार डहाणू, तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार व कासा परीसरातील नागरीक हे उपस्थीत होते.

मा.वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदरचा कार्यक्रम हा सपोनि/श्रीकांत शिंदे, प्रभारी अधिकारी कासा पोलीस ठाणे, पोउपनि/संदिप पाटील, पोउपनि/संदिप नांगरे व कासा पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार यांनी यशस्वीरित्या राबविला.

Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner




Scanned with CamScanner



Scanned with CamScanner